# <u>सौर कृषिपंप योजनेसाठी अर्ज</u>

| पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

प्रति
मा. विभागीय महाव्यवस्थापक,
महाऊर्जा कार्यालय, -------------------.

विषय:- अटल सौर कृषिपंप योजना-२ मधील पंप आस्थापित करून मिळण्याबाबत.

महोदय,

मी ---------------------------------------- गाव --------------- तालुका ------------ जिल्हा ------- येथील शेतकरी असून माझी शेती ओलिताची करण्याकरिता माझ्याकडे कृषिपंपाचे वीज कनेक्शन उपलब्ध नाही. मला माझी शेती ओलिताची करण्यासाठी --- अश्वशक्ती क्षमतेचा ए.सी./ डी.सी. प्रकारचा सौर कृषिपंप आस्थापित करुन देण्यात यावा ही विनंती. मी सदर धोरणांतर्गत अटी व शर्तीनुसार कृषिपंपास पात्र असून त्यासाठी खालील बाबींची पूर्तता विनाअट करण्यास मी तयार आहे.

१) सौर कृषिपंपाला लागणारी पुरेशी सावली विरहित माझ्या मालकीची जागा उपलब्ध करून देणे.

२) सौर कृषिपंपासाठी आवश्यक असणारा लाभार्थी हिस्सा भरणे.

३) सौर कृषिपंप आस्थापित झाल्यानंतर त्याबाबत बंधपत्र करून देणे व तो स्वत:कडे हस्तांतरित करून घेणे.

४) सौर कृषिपंपाची दैनंदिन देखभाल व देखरेख व सुरक्षेची जबाबदारी सर्वस्वी माझी आहे. मी मागणी केलेल्या ठिकाणी महावितरणकडुन कृषिपंपास वीज जोडणी घेतलेली नाही. जर माझ्याकडुन सदर सौर कृषिपंपाला काहीही नुकसान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी माझी राहील, याची मला जाणीव आहे.

५) सदर सौर कृषीपंप बसविण्याकरीता माझ्या शेत जमिनीत प्रवेश करण्याच्या परवानगीस माझी सहमती आहे व तशी मी हमी देत आहे. तसेच सौर कृषिपंप तपासणीसाठी वेळोवेळी आलेल्या अधिकाऱ्यांना, दुरुस्ती कर्मचाऱ्यांना योग्य ते सहकार्य मी करीन व त्यात हरकत / अडथळा करणार नाही.

६) मला सदर सौर कृषिपंप कोणत्याही परिस्थितीमध्ये हस्तांतरीत, विक्री करण्याची, तांत्रिक बदल, तसेच हमी कालावधीत दुरुस्ती करण्याची परवानगी नाही, याची मला जाणीव आहे.

७) सदर सौर पंपाच्या साधानांची चोरी झाल्यास त्याचा मी प्रथम खबरी अहवाल जवळच्या पोलीस ठाण्यात सादर करुन त्याची माहिती महाऊर्जा कार्यालयस दयावयाची जबाबदारी घेईल.

८) सदर सौर कृषिपंपाचा संचमांडणीत मी कोणतीही फेरफार अथवा बदल करणार नाही असे घडल्यास त्या कारणाने होणाऱ्या नुकसानीस मी स्वत: जबाबदार राहीन. काही तांत्रिक कारणांनी अथवा सौर कृषिपंपाच्या कार्यप्रणालीतील दोषामुळे सौर कृषिपंप बंद राहिल्यास त्याकारणाने होणाऱ्या शेतमालाच्या नुकसानीस महाऊर्जा जबाबदार राहणार नाही याची मला पुर्ण कल्पना आहे व ती मला मान्य आहे.

९) सौर कृषिपंप व्यवस्थित कार्यरत ठेवून माझ्याकडील जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली आणणे.

१०) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी माझ्याकडे शाश्वत जलस्त्रोत उपलब्ध आहे. तसेच माझ्याकडे पारंपारिक पध्दतीने विद्युत जोडणी नसल्याबाबत हमी देत आहे.

| अ. क्र. | लाभार्थ्यांची माहिती | |
|---|---|---|
| १ | शेतकऱ्याचे पूर्ण नाव | |
| | संपूर्ण पत्ता | |
| | गावाचे नाव | |
| | तालुका | |
| | जिल्हा | |
| | दूरध्वनी | |
| | भ्रमणध्वनी क्र. | |
| | शेतकऱ्याचा प्रवर्ग (अ.ज. / अ.जा. / खुला) | |
| | आधार कार्ड | |
| | पॅन कार्ड क्र. | |
| | बँक खाते क्र. | |
| | बँकेचे नाव | |
| | शाखा | |
| | आय.एफ.एस.सी. क्रं. (IFSC Code) | |
| २ | शेतकऱ्याकडे असलेल्या जमिनीचे एकूण क्षेत्र<br>(७/१२ चा उतारा तसेच अल्पभूधारक असल्याबाबत दाखला जोडावा) | |
| ३ | शेतकऱ्याकडे जमीन ओलित करण्यासाठी शासकीय योजनेतून विहीर घेण्यात आली आहे का? असल्यास, योजनेचे नाव लिहावे. | |
| | विहिरीचा तपशील :- व्यास :- खोली :- | |
| | विंधन विहिरीचा तपशील :- व्यास :- खोली :- | |
| | सर्वसाधारणणपे पाण्याची पातळी :- उन्हाळा :- हिवाळा :- | |
| ४ | शेतकऱ्याच्या विहिरीतील पाण्यापासून ओलित करणे शक्य आहे का?<br>(समोरच्या रकान्यात होय / नाही असे लिहावे) | |
| ५ | शेतकरी घेत असलेल्या पिकांची नावे | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | शेतकऱ्याकडे कृषिपंपासाठी वीज कनेक्शन आहे का?<br>(समोरच्या रकान्यात होय / नाही असे लिहावे) | | |
| ७ | सौर कृषिपंप आस्थापित करण्यासाठी उपलब्ध असणारी सावली विरहित जागा (३ अश्वशक्ती क्षमतेसाठी किमान ६०० चौ. फूट व ५ अश्वशक्ती क्षमतेसाठी किमान ८०० चौ. फूट)<br>(समोरच्या रकान्यात उपलब्ध क्षेत्रफळ लिहावे) | | |
| ८ | विहिरीवर सौर कृषिपंप बसविण्यासाठी शिफारस केलेली पंपाची क्षमता (आवश्यकतेनुसार समोरच्या रकान्यात √ अशी खूण करावी.) | ए.सी. | डी.सी. |
| अ | ३ अश्वशक्ती | | |
| ब | ५ अश्वशक्ती | | |

या योजनेमधून सौर कृषिपंप आस्थापित करून घेतल्यास मला महावितरणकडून कृषिपंपासाठी वीज कनेक्शन मिळणार नाही याची मला पुर्ण जाणीव आहे.

तरी या योजनेमधून सौर कृषिपंप आस्थापित करून मिळावा ही विनंती.

साक्षीदाराची स्वाक्षरी

नाव :----------------------------------

लाभार्थी शेतकऱ्याची स्वाक्षरी / अंगठा

नाव :----------------------------------

(टीप :- सौर अटल कृषीपंप योजना - २ अर्ज दाखल करण्याकरीता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही.)